ePaper

## विनयकुमार चौबे पिंपरी चिंचवडचे नवे पोलीस आयुक्त



| वर्ष - 6 | अंक - 240 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- शाईफेक प्रकरण नडलं!
- करसंकलन विभागाची 'रेकॉर्ड ब्रेक' कामगिरी!
- महापालिका निवडणूक 4 महिने लांबणीवर, इच्छुक थंडावले

www.mahaenews.com | बुधवार | दिनांक 14 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# 'नमामी इंद्रायणी' !

## नदी सुधार प्रकल्पासाठी 995 कोटींच्या 'डीपीआर'ला तत्वत: मंजुरी



| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

श्रीक्षेत्र देहू आणि श्रीक्षेत्र आळंदी या दोन तीर्थस्थानांना जोडणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी तब्बल ९९५ कोटी रुपयांचा विस्तृत प्रकल्प अहवाल (डीपीआर) पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने तयार केला आहे. त्याला राज्य सरकारच्या उच्चाधिकार समितीने तत्वत: मान्यता दिली आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑक्टोबर महिन्यात श्रीक्षेत्र आळंदीचा दौरा केला होता. त्यावेळी इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प राबविण्यासाठी आवश्यक अनुदान आणि नियोजन करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले होते. त्यावर तात्काळ कार्यवाही करीत दोनच दिवस नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांची बैठक घेण्यात आली. त्यानंतर नुकत्याच झालेल्या उच्चाधिकार समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत सकारात्मक निर्णय घेण्यात आला.

### » शिंदे- फडणवीस सरकारचे पिंपरी-चिंचवडकरांना 'न्यू इअर गिफ्ट'
### » मंत्रालयातील उच्चाधिकार समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत निर्णय



पिंपरी-चिंचवड शहरातून इंद्रायणी नदी २०.६० किमी लांब वाहते. तसेच, आळंदी नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रामध्ये १.८० इतकी वाहते. नदीचा दुसरा काठ पुणे महानगर विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) च्या हद्दीत आहे. त्यामुळे इंद्रायणी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प संयुक्तपणे राबवण्याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने प्रस्ताव तयार केला आहे. तो प्रस्ताव राज्याच्या नगरविकास मंत्रालयाकडे पाठवण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह उपस्थित होते.केंद्र आणि राज्य सरकारकडून मिळणार निधी... इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका आणि आळंदी भागात येणारा खर्च केंद्र व राज्य सरकारकडील शासकीय अमृत-२ योजनेंतर्गत घेता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे पीएमआरडीच्या माध्यमातून काठावरील कामे तसेच चाकण औद्योगिक क्षेत्राकडून येणाऱ्या नाल्यामधील सांडपाणी गोळा करणे व प्रक्रिया करण्याचे काम एमआयडीसी व पीएमआरडीच्या संयुक्त विद्मयाने करता येणे शक्य आहे. कारण, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पीएमआरडीएचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. त्यांच्या माध्यमातून सदर प्रकल्प राबवणे सुलभ होणार आहे. त्याचप्रमाणे आळंदी नगरपंचायत क्षेत्रातील कामे अमृत २.० तसेच तीर्थक्षेत्र विकास निधीमधून पूर्ण करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडून २५ टक्के आणि राज्य सरकारकडून २५ तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेचा स्वनिधी उभारण्यात येणार आहे. त्याअंतर्गत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून ५२६ कोटी रुपये, पीएमआरडीच्या माध्यमातून ३९५ कोटी रुपये आणि आळंदी नगरपंचायतीच्या पुढाकाराने ७४ कोटी रुपये असा सुमारे ९९५ कोटी रुपयांचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार केला आहे, अशी माहिती पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिली.

### आमदार लांडगे यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला "बुस्टर डोस"

भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी 'भोसरी व्हीजन-२०२०' च्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील महत्त्वाकांक्षी प्रकल्प 'नमामी गंगा' च्या धर्तीवर "नमामी इंद्रायणी" हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला होता. २०१७ मध्ये महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर हा प्रकल्पावर काम सुरू करण्यात आले. मात्र, २०१९ मध्ये राज्यात महाविकास आघाडीची सत्ता आली. महाविकास आघाडीच्या अडीच वर्षांच्या काळात निधीअभावी इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प रखडला होता. मात्र, राज्यात शिंदे-फडणवीस सरकारची स्थापना झाल्यानंतर पुन्हा "नमामी इंद्रायणी" प्रकल्पाला संजीवनी मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने इंद्रायणी नदीच्या पुनरुज्जीवनासाठी ९९५ कोटी रुपयांच्या 'डीपीआर' मंजुरी मिळाली असून,शिंदे-फडणवीस सरकारच्या काळात आमदार लांडगे यांच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला "बुस्टर डोस" मिळाला आहे.

> 'नमामी गंगा' प्रकल्पाच्या धर्तीवर इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प राबवण्यास महापालिका प्रशासन सकारात्मक आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका, 'पीएमआरडीए', आळंदी नगरपरिषद, देहू नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आणि केंद्र व राज्य सरकारच्या मदतीने हा प्रकल्प पूर्ण केला जाईल. त्याबाबत 'डीपीआर' तयार केला असून, राज्य सरकारच्या उच्चाधिकार समितीने त्याला तत्वत: मान्यता दिली आहे. या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आळंदी दौऱ्यात निर्देश दिले होते. आमदार महेश लांडगे यांनीही या प्रकल्पासाठी शासन दरबारी पाठपुरावा केला असून, आगामी दोन-तीन महिन्यांत केंद्र सरकारकडून मान्यता मिळताच प्रकल्पाचे कामाला गती देण्यात येईल. संपूर्ण महाराष्ट्रासाठी हा प्रकल्प 'रोल मॉडेल' असेल.
>
> - शेखर, सिंह, आयुक्त व प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.

## पिंपरीचे पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांची बदली, पिंपरीचे नवनियुक्त पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे

# शाईफेक प्रकरण नडलं!

## पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांची बदली, रितेश कुमार यांची पुणे पोलीस आयुक्तपदी नियुक्ती

पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवड चे मावळते पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांना चंद्रकांत पाटील यांच्यावरील शाईफेक प्रकरण भोवलं आहे. त्यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी विनयकुमार चौबे हे आता पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्त पदाची सूत्रे हाती घेणार आहेत. मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर झालेल्या शाईफेक प्रकरणानंतर अंकुश शिंदे यांची बदली निश्चित होती अस बोललं जात होतं. त्याला आज पूर्णविराम मिळालेला आहे. त्यांची बदली नाशिकच्या आयुक्तपदी करण्यात आली. याबाबत चे आदेश गृहविभागाने आज काढले आहेत. विनयकुमार चौबे हे अपर पोलिस महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई या ठिकाणी कार्यरत होते.**



पिंपरी-चिंचवडचे मावळते पोलिस आयुक्त अंकुश शिंदे यांची बदली नाशिक येथे पोलीस आयुक्तपदी झाली आहे. तर, पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाची सूत्रे विनयकुमार चौबे हे हाती घेणार आहेत. एप्रिल महिन्यात आयपीएस कृष्ण प्रकाश यांच्या जागी अंकुश शिंदे यांची वर्णी लागली होती. अवघ्या आठ महिन्याच्या कालावधीत अंकुश शिंदे यांनी अवैध धंद्यांवर कारवाई करत अनेकांचे धाबे दणाणून सोडले होते. गुन्हेगारीच्याबाबत देखील चढउतार पहायला मिळाले. दरम्यान, शनिवार पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक फेक करण्यात आली होती. या प्रकरणी अंकुश शिंदे यांनी तडकाफडकी निर्णय घेऊन अकरा जणांचं निलंबन करण्यात आलं होतं. तर दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या केल्या होत्या. पोलिस आयुक्तालयात शिंदेंबाबत सुप्त नाराजी होती. राजकीय दबावापोटी शाईफेक करणाऱ्या तिघांवर खुनाचा प्रयत्न हे कलम लावल्याचा आरोप देखील त्यांच्यावर होता. नुकतंच अंकुश शिंदे हे मुंबई ला जाऊन आले आहेत. त्यामुळं त्यांच्या बदलीची जोरदार चर्चा होती. त्याला आज पूर्ण विराम मिळाला असून नाशिक येथे त्यांची वर्णी लागली आहे.

राज्यातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश मंगळवारी रात्री गृहविभागाने दिले. त्यानुसार पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांची बदली करण्याचे आदेश करण्यात आली. गुप्ता यांना गृहविभागाने अद्याप कोणताही पदभार दिलेला नाही. दरम्यान, सीआयडीचे प्रमुख रितेश कुमार यांची पुणे पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आल्यानंतर सीआयडीच्या प्रमुखपदी प्रशांत बुरडे यांची नियुक्ती करण्यात आली.

### अमिताभ गुप्ता यांची प्रभावी कारकीर्द...




पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांनी शहरातील गुंड टोळ्यांना वचक बसविण्यासाठी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याचा प्रभावी वापर केला होता. गुप्ता यांच्या कार्यकाळात शहरातील ११४ गुंड टोळ्यांच्या विरोधात कारवाई करण्यात आल्याने जरब बसली. झोपडपट्टी प्रतिबंधक कायद्यान्वये (एमपीडीए) गुंडांच्या विरोधात कारवाई करण्यात आली होती. गुप्ता यांच्या कार्यकाळात शहरातील ८१ गुंडांच्या विरोधात एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करुन त्यांना वर्षभरासाठी कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले.

---

## पुण्यात कडकडीत बंद; दुपारनंतर व्यवहार सुरळीत

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी अवमानकारक वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ विविध राजकीय पक्ष, संघटनांनी मंगळवारी बंद पुकारला. बंदमुळे शहरात सकाळपासून शुकशुकाट असल्याचे पाहायल मिळाला. दुपारी तीननंतर शहरातील व्यवहार पूर्ववत झाले. हॉटेल्स आणि दुकाने उघडण्यात आली.





बंदमुळे शहरातील व्यवहारावर परिणाम झाला. सकाळपासून शहरात शुकशुकाट होता. बंदमुळे शहर तसेच उपनगरात कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सकाळी पीएमपी बस सेवा तसेच रिक्षाही बंद होत्या. शहरातील हॉटेल, दुकाने बंद होती. सकाळी अकरानंतर डेक्कन जिमखाना येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून मोर्चाची सुरुवात झाली.. लक्ष्मी रस्तामार्गे मोर्चा शिवाजी रस्त्यावर लाल महाल चौकात दुपारी दीडच्या सुमारास पोहोचला. मोर्चाच्या मार्गावर पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. मोर्चा शांततेत पार पडला. बंदला शहरातील व्यापारी संघटनांनी पाठिंबा दर्शविला होता.

त्यामुळे लक्ष्मी रस्ता, तुळशीबाग, शनिपार, मंडईसह व्यापारी पेठेतील दुकाने सकाळी बंद होती. दुपारी तीननंतर व्यापारी पेठेतील दुकाने उघडली. हॉटेल उघडण्यात आली. खाद्यपदार्थ विक्रीच्या गाड्या सुरू झाल्या. पीएमपी सेवा तसेच रिक्षा सुरू झाल्यानंतर शहरातील सर्व व्यवहार सुरळीत झाले. बंदच्या कालावधीत शहरात अनुचित प्रकार घडला. मोर्चाचा मार्ग तसेच शहरातील संवेदनशील भागात १०० पोलीस अधिकारी तसेच एक हजार पोलीस कर्मचाऱ्यांचा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### विद्यार्थी, नोकरदारांची गैरसोय...

**सकाळी पीएमपी बस आणि रिक्षा बंद असल्याने विद्यार्थी आणि नोकरदारांची गैरसोय झाली. शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षा बंद असल्याने पालकांची धावपळ उडाली. दुपारनंतर शहरातील बहुतांश मार्गावरील पीएमपी सेवा सुरू झाली तसेच रिक्षा सुरू झाल्याने नोकरदार महिलांना दिलासा मिळाला.**

## अखेर शाईफेक प्रकरणातील तिघांवरील ३०७ कलम हटवले

### आरोपीना जामीन मिळण्याची शक्यता

। मुंबई । महाईन्यूज ।

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक करणाऱ्या तिघांवर ३०७ सह इतर कलमानुसार गुन्हा दाखल होता. यामधील ३०७ म्हणजे खुनाचा प्रयत्न हे कलम कमी करण्यात आले आहे.

शनिवारी चंद्रकांत पाटील यांच्यावर शाईफेक झाली होती. यात तिघांना घटनास्थळावरून ताब्यात घेण्यात आलं होतं. या प्रकरणातराजकीय दबावापोटी पोलिसांकडून आरोपींवर खुनाचा प्रयत्न-३०७ हे कलम लावण्यात आलं असा आरोप आरोपीचे वकील सचिन भोसले यांनी केला होता. तसंच ३०७ कलम लावल्यामुळे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर विशेषतः भाजपावर सडकून टीका केली होती. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि



महात्मा ज्योतिबा फुले यांच्याबाबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. यानंतर राज्यभरातून विविध संघटना, राजकीय पक्षांनी आंदोलने केली. दरम्यान शनिवारी पिंपरी -चिंडवड दौऱ्यावर असतांना चंद्रकांत पाटील यांच्यावर शाई फेक करण्यात आली. यानंतर तिघांना पिंपरी-चिंचवड पोलिसांनी ताब्यात घेतलं होतं. त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. उद्या त्यांना पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार असून त्यांच्यावरील ३०७ कलम हे हटवल्याने आता त्यांना जामीन मिळण्याची शक्यता आहे.

# करसंकलन विभागाची ‘रेकॉर्ड ब्रेक’ कामगिरी!

## 500 कोटी रुपयांची विक्रमी वसुली!: सहाय्यक आयुक्त निलेश देशमुख यांची माहिती

पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिका कर संकलन विभागाच्या माध्यमातून आतापर्यंत ‘रेकॉर्ड ब्रेक’ कामगिरी करीत तब्बल ५०० कोटी रुपयांच्या मिळकतकर वसुलीचा टप्पा पूर्ण केला आहे. गेल्या काही दिवसांपासून कर संकलन विभागाकडून विविध योजना आणि मिळकतधारकांना प्रोत्साहन देण्यात येत आहे. त्यामुळे महापालिकेच्या ‘तिजोरीत’ मोठ्या प्रमाणात ‘गल्ला’ जमू लागला आहे.**



कर संकलन विभागाचे प्रमुख निलेश देशमुख यांनी कर संकलन विभागाच्या कारभारात सूसुत्रता आणली असून, त्याचा फायदा कर वसुलीमध्ये झालेला दिसत आहे. मिळकतकर वसुलीसाठी देशमुख यांनी वसुली मोहीम राबवत असतानाच विविध योजना पिंपरी-चिंचवडकरांसाठी सुरू केल्या. या योजनांद्वारे मिळकतकरामध्ये सवलती देण्यात येत आहेत. त्या योजनांना पिंपरी-चिंचवडकरांचा प्रतिसाद मिळाला आणि विक्रमी मिळकतकर वसुली करण्यात आली. मिळकतकर थकबाकीदार मिळकतधारकांना महापालिका प्रशासनाकडून वेळोवेळी आवाहन करण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षात कर संकलन विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निर्देशानुसार, कर्तव्यनिष्ठपणे जबाबदारी पार पाडली. त्यामुळे करसंकलन विभागाची कामगिरी लक्षवेधी ठरली, अशी प्रतिक्रिया निलेश देशमुख यांनी दिली.

### सोसायटीधारकांना प्रोत्साहन...

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने पर्यावरणपुरक सोसाटींकरीता मिळकतकरामध्ये सूट योजनेची अंमलबजावणी केली आहे. या योजनेलाही सोसायटीधारकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना)- 5 टक्के, एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना - 3 टक्के, ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा व एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना - 8 टक्के, झिरो वेस्ट संकल्पना राबविणारी निवासी आस्थापना (ओला व सुका कचरा पूर्णतः जिरविणाऱ्या आस्थापना)- 8 टक्के, झिरो वेस्ट संकल्पना राबविणारी निवासी आस्थापना (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना) व एसटीपी असलेल्या निवासी आस्थापना - 10 टक्के अशी सवलत दिली जात आहे. त्यासाठी सोसायटीधारकांनी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गोदान करीत सागर थोरात यांचा गोसंवर्धनाचा संदेश!

## घुले महाराजांकडून कौतूक : संत तुकाराम महाराज गोशाळेला दिली गाय भेट

पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणाऱ्या मोजकेच सामाजिक कार्यकर्ते आढळतात. मात्र, सागर थोरात यांनी सामाजिक उपक्रमांसह गोशाळेला गोदान करीत आदर्श निर्माण केला आहे. थोरात यांनी आपल्या कृतीतून गो-संवर्धनाचा संदेश दिला आहे, असे गौरोवोद्गार घुले महाराज यांनी काढले.**



भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार यांचे कट्टर समर्थक आणि चांगभलं प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर थोरात यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त संत तुकाराम महाराज गोशाळेला गिर गाय भेट दिली. यावेळी गोशाळेचे प्रमुख घुले महाराज, आमदार लांडगे यांच्या सौभाग्यवती पूजा लांडगे, कामगार नेते सचिन लांडगे यांच्या सौभाग्यवती प्रिया लांडगे, देहू नगरपंचायतीचे मुख्य आरोग्य अधिकारी डॉ. किशोर यादव, अक्षय नेवाळे, तानाजी गोंदवले, संकेत नेवाळे यांच्यासह प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित हेते.

शिवांजली सखी मंचच्या अध्यक्षा पूजा लांडगे म्हणाल्या की, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे. त्याचा अनेक गरजू लोकांना फायदा होतो. सागर थोरात याचे कार्य निश्चितच नव्या पिढीसाठी आदर्शवत आहे.

घुले महाराज म्हणाले की, समाजामध्ये लोकोपयोगी उपक्रमांनी वाढदिवसा साजरे करणारे किंवा गोदान करणारे खूप कमी लोक आहेत. सागर थोरात यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. साधार गोशाळेच्या माध्यमातून वारकरी सांप्रदयाचे शिक्षण घेणाऱ्या मुलांचे संगोपन केले जाते. समाजसेवेत मदत करणाऱ्या थोरात यांचे विधायक उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहेत.

> आमदार महेश लांडगे यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून सामाजिक क्षेत्रात काम करीत आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणमधील नैसर्गिक आपत्तीच्या काळात लांडगे यांनी महाराष्ट्रातून सर्वाधिक मदत उभा केली होती. त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळाली. त्यामुळे वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्याचा संकल्प माझ्या सहकाऱ्यांनी केला. यापुढील काळातही अशाचप्रकारे काम करण्याचा मनोदय आहे.
>
> **-सागर थोरात,** अध्यक्ष, चांगभलं प्रतिष्ठान, पिंपरी-चिंचवड.

# महापालिका निवडणूक 4 महिने लांबणीवर, इच्छुक थंडावले

## गुडघ्याला बाशिंग बाधून तयार असणाऱ्यांची गोची...

। पिंपरी । महाईन्यूज ।

महापालिका निवडणुकीबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेली सुनावणी महिनाभर लांबणीवर पडली आहे. जानेवारीत सुनावणी होणार आहे. राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार निवडणूक प्रशासनाने २०१७ नुसार निवडणुकीबाबत सज्जता ठेवली आहे. त्यामुळे फेब्रुवारीत होणारी निवडणूक एप्रिल-मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे गुडघ्याला बाशिंग बाधून तयार असणाऱ्यांची गोची झाली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीचा गोंधळ गेले वर्षेभर सुरू आहे. प्रभाग रचनेत झालेला विलंब, ओबीसी आरक्षणाचा गोंधळ, चार, दोन आणि तीन असा प्रभाग रचनेचा गोंधळ यामुळे महापालिकेत प्रशासकीय राजवट सुरू करण्यात आली. त्यामुळे १४ मार्चपासून प्रशासकीय राजवट सुरू आहे.

### तारीख पे तारीख

ऑगस्ट महिन्यात राज्यात सत्तांतर झाल्यानंतर २०१७ नुसारच निवडणूक घेण्याची सूचना निवडणूक आयोगाला केली आहे. त्यानुसार याबाबतचे प्रकरण न्यायालयात



प्रलंबित आहे. न्यायालयातील सुनावणी लांबणीवर पडत आहे. तर प्रत्येक वेळी राज्य सरकार नवे आदेश निवडणूक विभागास देत आहे. त्यामुळे गोंधळाची स्थिती आहे. न्यायालयाबरोबरच राज्य शासन, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाची प्रतीक्षा केली जात आहे.

### प्रशासकीय गोंधळ

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजपा यांचे सरकार आहे. युती सरकार चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने निवडणूक घेण्यास उत्सुक आहेत. तर तीन नुसार प्रभाग रचना झाल्याने आणि आरक्षण झाल्याने न्यायालय काय निर्णय घेतेय याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर प्रशासन आणि राजकीय नेत्यांचाही गोंधळ झाला आहे. चार सदस्यीय प्रभाग पद्धतीने निवडणूक होणार?

## संपादकीय

# ‘आप’ की कसम!

***तसे पाहू गेल्यास केवळ एका शहराच्या महापालिकेची ही निवडणूक. पण काय काय नाही केले गेले गेल्या काही महिन्यांत? केंद्र सरकारी यंत्रणांनी ‘आम आदमी पक्षा’च्या नेत्यांवर छापे घातले. त्यांचे नवनवे भ्रष्टाचार शोधून काढले आणि ते या नेत्यांमुळेच झाल्याचे आरोप केले.***

त्या आरोपांसाठी ‘आप’च्या मंत्र्यांना तुरुंगात डांबले. तुरुंगातले छायाचित्रण माध्यमांना पुरवले गेले. हवेच्या प्रदूषणासाठीही ‘आप’ला दोष दिला. इतकेच काय पण दिल्ली महापालिकेच्या निवडणुका लांबवून गुजरात, हिमाचल प्रदेश निवडणुकांबरोबर आयोजित केल्या. दोन डझनांहून अधिक केंद्रीय मंत्री, अनेक मुख्यमंत्री प्रचाराच्या मैदानात उतरले. आणि इतकी उरस्फोड केल्यानंतरही सर्वसामथ्र्यवान केंद्र सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडे सुमारे दोन कोटी वस्तीच्या राजधानी दिल्लीने पाठच फिरवली. परिणामी राजधानी दिल्ली हे राज्य आणि दिल्ली महापालिका या दोन्हींतून भाजपचे उच्चाटन झाले. गेली जवळपास १५ वर्षे दिल्ली महापालिकेवर भाजपची एकहाती सत्ता होती. ‘आप’ने ती उद्ध्वस्त केली. दिल्ली या राज्यातून ‘आप’ला उखडून टाकण्यासाठी भाजप गेली १० वर्षे जंग जंग पछाडतो आहे. त्यात यश येणे राहिले दूर. उलट भाजपच्या जे हातात होते, तेही धुपले गेले. वास्तविक एका शहराच्या महापालिकेची ही निवडणूक. तिची दखल एरवी घ्यावीही लागली नसती. पण आता या निवडणुकीचा निकाल हा राष्ट्रीय चर्चेचा विषय होतो. म्हणून या निकालावर भाष्य करणे आवश्यक.

कारण संसद असो, एखादे राज्य असो किंवा येडशी बुद्रुक वा झुमरीतलैय्याची ग्राम-शहर निवडणूक असो. ती इरेस पेटूनच लढायला हवी आणि नुसती लढायलाच नाही तर जिंकायलाही हवीच हवी, ही भाजपची ‘सर्व काही माझे’ ही ईर्ष्या. याआधी हैदराबाद महापालिका निवडणुकीत ती दिसली, ताज्या दिल्ली महापालिका निवडणुकीतही ती दिसून आली आणि काही महिन्यांनी (तरी) होणाऱ्या मुंबई महापालिका निवडणुकांतही ती दिसेल. त्यातही दिल्ली महापालिका निवडणूक ही भाजपने अधिक प्रतिष्ठेची केली. याचे कारण त्या पक्षासाठी ‘आप’ ही नवी आणि मोठी डोकेदुखी ठरू लागला आहे. कानाशी गुणगुणणारा एखादाच डास शांत झोपेच्या आड येतो तद्वत ‘आप’ने भाजपसाठी उच्छाद मांडला आहे. या पक्षास धर्माच्या आधारे कोपऱ्यात गाठून मुस्लीमधार्जिणा वगैरे ठरवता येत नाही. कारण त्या पक्षाचा प्रमुख जाहीरपणे ‘हनुमान चालीसा’ मुखोद्गत असल्याचे सिद्ध करून भाजप नेत्यांना अडचणीत आणतो. अरविंद केजरीवालांचा शहरी श्रावणबाळ ज्येष्ठ नागरिकांच्या अयोध्या तीर्थाटनाची व्यवस्था करतो. अन्य परंपरागत पक्षांप्रमाणे या पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप करता येत नाहीत. केले तरी ते चिकटत नाहीत. आणि हे भ्रष्टाचार प्रकरण जास्त ताणताही येत नाही. कारण इतक्या साऱ्या अन्य पक्षीय गणंगांना पावन करून घेतल्यावर कोणत्या तोंडाने ‘आप’ला भ्रष्ट म्हणायचे हा तसा प्रश्नच.

# स्वतंत्र पत्रकारिता संकटात






पत्रकारांनी नेहमी लोकांच्या बाजूने लेखणीचा वापर करायला हवा यात दुमत नाही. लोकशाहीत सत्ता आणि माध्यमे लोकांसाठीच काम करणारी असली पाहिजेत हा आदर्श विचार अलीकडे झपाट्याने समाप्त होण्याच्या मार्गावर आहे असे दिसत आहे. देशपातळीवर माध्यमांना आणि एकूणच पत्रकारितेला अच्छे दिन आहेत असे म्हणण्याचे धाडस होत नाही. याला भाजप आणि प्रधानमंत्री मोदी कारणीभूत आहेत का ? या प्रश्नाला माझे उत्तर ते एकटेच जबाबदार नाहीत असे असेल. एनडीटीव्हीचे अँकर रवीशकुमार यांच्या राजीनाम्यानाने देशभरात जी चर्चा सुरु झाली आहे तिने आगामी काळात देशातील माध्यमांचे स्वरूप काय असेल याचा आरसा दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या देशातील उद्योगपतींना मीडिया हाऊस विकत घेण्याची प्रेरणा अचानक व्हावी आणि ते सगळे संघ परिवाराच्या ताटाखालील मांजरे निघावीत असे अचानक झाले नाही. त्यासाठी आवश्यक ते वातावरण अगोदर माध्यम जगतात तयार करण्यात आले आणि आता लोखंड गरम आहे असे दिसताच हातोडा मारण्यात आला एवढाच त्याचा अर्थ आहे.

काही लोकांच्या नजरेत वागळे ,पुण्यप्रसून वाजपेयी,अभिसार शर्मा किंवा त्याच पंगतीतले रवीशकुमार इत्यादी पत्रकार याना केंद्रस्थानी ठेवून होणारी चर्चा वांझोटी आहे कारण त्यांना वाटते की हे सगळे पत्रकार डाव्या विचारसरणीचे आहेत त्यांना संघ परिवार करीत असलेले प्रयत्न किंवा त्यांची होणारी सरशी सहन होत नाही म्हणून काहीतरी खुसपट काढून हे लिब्रान्डु पत्रकार आकाशपाताळ एक करताना दिसत आहेत. मुळात पत्रकारिता आहे तिथेच आहे. तिला काहीही झालेले नाही. हे मूठभर लोक इतके छान चालले असताना उगाच भुई धोपटून कारण नसताना आकांडतांडव करीत आहेत. पुरोगामी विरुद्ध हिंदुत्ववादी या स्वरूपातही या वादाकडे बघणारे लोक भरपूर आहेत. वरच्या पातळीवर कोणत्या वैचारिक व्यूहरचना आखल्या जातात आणि त्यातून सत्य मांडणाऱ्या लोकांचे कसे पराभव घडवून आणल्या जातात अशा कट कारस्थानांची सामान्य लोकांना माहिती नसते.

रवीशकुमार यांनी दिलेल्या राजीनाम्याची गेल्या दोन दिवसापासून मोठी चर्चा सुरु असली तरी त्याची तयारी फार पूर्वीच झाल्याचे दिसते. मोदी सत्तेत आल्यानंतर आयबीएन ७ हा ग्रुप अंबानी यांच्या ताब्यात गेल्यावर पत्रकारितेवर नियंत्रण असले पाहिजे हा विचार प्रबळ व्हायला सुरुवात झाली. आपल्याकडे या ग्रुपचे आयबीएन-लोकमत हे चॅनेल होते. निखिल वागळे यांच्या हाती त्याची धुरा होती. २०१४ च्या आसपास सगळ्याच भाषिक चॅनेलमध्ये डाव्या विचारांच्या ब्राह्मण पत्रकारांची चलती होती ,ती आजही आहे. भाजपच्या विचारसरणीला अतिरेकी विरोध सुरु झाल्यावर " या डाव्या माकडांना ठेचले पाहिजे " अशी प्रतिक्रिया संघ परिवारात उमटताना आपण सगळ्यांनी बघितल्या. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आडून निखिल वागळे वैचारिक खुन्नस काढताहेत हे लक्षात आल्यावर आधी त्यांच्यावर लगाम लावण्यात आला या घटनेत रवीशकुमार यांच्या राजीनाम्याची मांडणी केलेली दिसते.

माध्यमे टीव्ही असोत वा वृत्तपत्रे त्यांनी कुणाला तरी आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करताना आपण धुतल्या तांदळासारखे असल्याचा जो समज करून घेतला त्यातून पुढचे सगळे रामायण घडताना दिसत आहे. लोकांना अक्कल वाटण्याचे कंत्राट घेतलेल्या माध्यमांनी नेहमी इतरांच्या कर्तव्यावर बोट ठेवले आहे.

मात्र स्वतःच्या जबाबदाऱ्या ते जाणीवपूर्वक विसरले असे माझे आकलन आहे. अपुरा अभ्यास आणि जबाबदारीचे भान सैल झाले की केवळ इतरांच्या चेहऱ्यावरील धूळ दिसायला लागते,आपला चष्मा पण साफ करायचा असतो हेच माध्यमे विसरली आहेत. हा तर्क प्रिंट आणि इलेक्ट्रानिक या दोघांनाही लागू होतो. राहिला प्रश्न गेल्या आठ वर्षातील मोदींच्या एकूणच वर्तनाचा तर ते कोणताही सभ्य भारतीय व्यक्ती सहन करणार नाही असेच राहिले आहे. जगातील कोणत्याही सत्ताधाऱ्यांना त्यांच्या उणिवांवर बोट ठेवणारे घटक आवडत नसतात मोदी त्याला अपवाद कसे असतील ? सत्ताधारी म्हणून काँग्रेस मला अजिबात आवडत नाही मात्र जेव्हा काँग्रेस आणि भाजप अशी तुलना होते तेव्हा मला काँग्रेसच्या बाजूने झुकावेसे वाटते.

# शिंदे-फडणवीस हा तर असंवेदनशीलतेचा कळस

**प्रजेच्या पायात काटा जरी रुतला तरी राजाच्या डोळ्यातून टचकन पाणी यायला हवे असे वातावरण जिथे असते त्याला प्रजाभिमुख कारभार म्हटला जातो मात्र आताचे लोकशाहीतून उदयाला आलेले राजे किती कोडगे असू शकतात याची उदाहरणे दररोज बघायला मिळतात.**

रोम जळत होते तेव्हा तिथला राजा फिडल वाजवत होता हे आजवर आपण फक्त ऐकून होतो. काल त्याचे आधुनिक स्वरूप बघायला मिळाले. बीड जिल्हाधिकारी कार्यालयापुढे घरकुल पूर्ण करण्याच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेला बेघर व्यक्ती थंडीने कुडकुडत मेला मात्र समुद्धी मार्गावर शानदार सैर करणाऱ्या राजाला घरासाठी जीव देणाऱ्या प्रजेकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही.

लालफितशाहीचा कारभार आणि प्रशासन किती गेंड्याच्या कातडीच असते याचा नमुना बीडमध्ये पाहायला मिळाला आहे. हक्काचे घरकुल बांधून मिळावे तसेच, उरलेले हप्ते मिळावेत यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या दारात उपोषणाला बसलेल्या एका उपोषणार्थीकडे लक्ष द्यायला जिल्हाधिकारी आणि प्रशासनाला वेळ मिळाला नाही. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या दारातच थंडीने कुडकुडत या उपोषणार्थी व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेने सर्वत्र संताप व्यक्त केला जात असून, कारवाईची मागणी होत आहे.आप्पाराव भुजाराव पवार असे मृत व्यक्तीचे नाव आहे. आप्पाराव पवार



हे वासनावाडी येथील रहिवासी आहे. पवार हे गेल्या दोन दिवसांपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले होते.

शासनाने मंजूर केलेले घरकुल तातडीने बांधून देण्यात यावे, यासह इतर मागण्यांसाठी पवार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारात उपोषण करत होते.

मात्र त्यांच्या उपोषणाची साधी दखलही घ्यायला जिल्हाधिकारी राधा विनोद शर्मा यांच्यासह प्रशासनाला वेळ मिळाला नाही. त्यामुळे थंडीत कुडकुडत उपोषणाला बसलेले आप्पाराव पवार यांचा मृत्यू झाला आहे. शुक्रवारी अप्पा पवार हा व्यक्ती आपल्या कुटुंबासह आमरण उपोषणाला बसला. त्याआधी त्याने सरकार दरबारी जे निवेदन आणि कार्यालयाचे उंबरठे झिजवण्याचे जे सोपस्कार पार पाडायचे असतात ते सगळे उरकले मात्र सरकारी कातडीला त्याच्या प्रश्नाकडे बघायला वेळ नव्हता. सामान्य माणसाला गांधींनी या देशात शेवटचे प्रभावी अस्त्र देऊन ठेवले त्याचा मोठा आधार आजवर त्याला वाटत आला आहे.

सामान्य माणसाच्या आवाक्यात असलेले सगळे प्रयत्न करून झाल्यावर उपोषण किंवा आत्मदहन असे टोकाचे दोनच मार्ग त्याच्याकडे बाकी असतात. त्यापैकी कुठलातरी मार्ग हा व्यवस्थेने पिचून काढलेला व्यक्ती निवडत असतो. मात्र नोकरशाही आणि प्रशासन एवढे निष्ठुर बनले आहे की माणसाच्या मरणाचे त्यांना कोणतेही सोयरसुतक वाटत नाही. उपद्रवशून्य जनता नेहमी त्यांच्या पायाखाली तुडवली जाते. बीडची भयावह घटना त्याचेच प्रतीक मानली पाहिजे.

मतांवर किंवा खुर्चीवर जो कोणताही परिणाम घडवू शकत नाही अशा घटकाला काडीचीही किंमत शासन,प्रशासन देत नसते , त्याचा अतिरेक झाल्यावर विचार करणारी जनता नक्षलवादाकडे वळत असते. बीडचे जिल्हाधिकारी राधामोहन शर्मा या अमराठी माणसाचा त्यात दोष नाही.

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्यातील शाळांना 1100 कोटींचे अनुदान!

## राज्य मंत्रिमंडळाचा महत्त्वाचा निर्णय



। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील शाळांना अनुदान देण्याचा आणि त्यासाठी १ हजार १०० कोटी रुपये उपलब्ध करून देण्यास मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे ६ हजार १० प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना तसेच १४ हजार ८६२ तुकड्यांना अनुदान मिळेल. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ६३ हजार ३३८ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना होणार आहे.

त्रुटींच्या पुर्ततेनंतर २० टक्के अनुदानासाठी ३६७ शाळा पात्र असून ४० टक्के अनुदानासाठी २८४ शाळा पात्र आहेत. २० टक्के अनुदान घेत असलेल्या २२८ शाळांना ४० टक्के अनुदान देण्यात येईल. तर ४० टक्के अनुदान घेत असलेल्या २ हजार ९ शाळांना ६० टक्के अनुदान देण्यात येईल. मूल्यांकनानुसार अनुदानास पात्र परंतु राज्य सरकारच्या स्तरावर अद्याप घोषित न केलेल्या ३ हजार १२२ शाळांना २० टक्के अनुदान मिळणार आहे. अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अटी आणि शर्थी लागू राहतील. त्याचप्रमाणे त्रुटींची पूर्तता करण्यासाठी शेवटची संधी म्हणून एक महिन्याची मुदत देण्यात येत आहे. अन्यथा पुढील एक महिन्यात अशा शाळा आणि तुकड्यांना स्वयं अर्थसाहाय्यित म्हणून मान्यता देण्यात येईल. ज्या शाळा यासाठी तयार होणार नाहीत, त्यांची मान्यता रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल, असेही सरकारने स्पष्ट केले आहे.

राज्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळेतील १ हजार ५८५ रोजंदारी आणि तासिका कर्मचाऱ्यांना नियमित करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या संदर्भात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या होत्या. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने २९ जुलै २०२२ रोजी दिलेल्या आदेशाचे पालन करण्यासाठी या कर्मचाऱ्यांना १ नोव्हेंबर २०२२ पासून नियमित करण्याचा निर्णय घेण्यात आला. सेवा नियमित करण्याच्या दिनांकापासून सर्व प्रत्यक्ष लाभ त्यांना मिळतील. नियमित करण्यात येणाऱ्या प्राथमिक शिक्षक कर्मचाऱ्यांनी ५ वर्षाच्या कालावधीत शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### आंबेगावातील 'शिवसृष्टी' प्रकल्पास 50 कोटींचा निधी

पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील आंबेगाव बु. येथे साकारण्यात येणाऱ्या 'शिवसृष्टी' प्रकल्पास ५० कोटी रुपयांचा निधी विशेष बाब म्हणून अनुदान देण्याच्या निर्णयास आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात प्रतापगडावरील भवानीमाता स्मारक, माची, रायगडावरील बाजारपेठ, रायगड किल्ल्याचा देखावा, राजगडावरील राजसभा, पाली दरवाजा प्रतिकृती, खान्देरी आणि पन्हाळा लढाई देखावा, याशिवाय अ‍ॅम्फिथियटर, प्रशासकीय इमारत-सरकारवाडा अनुषांगिक सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. मूळ प्रकल्प ४३८ कोटी ६८ लाख रुपयांचा असून यातून ३०० हून अधिक जणांना रोजगार मिळणार आहे.

### शासनमान्य ग्रंथालयाच्या अनुदानात 60 टक्के वाढ

राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानात ६० टक्के वाढ करून वाचन संस्कृतीला बळ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या वाढीमुळे ६६ कोटी ४९ लाख रुपये इतका वित्तीय भार पडेल. जिल्हा आणि तालुका स्तरावरील अ आणि ब तसेच क आणि ड ग्रंथालयाना याचा लाभ मिळेल.

### काजू बोर्डासाठी 200 कोटी रुपये

राज्यात काजू फळपीक विकास योजना लागू करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. काजू लागवडीपासून प्रक्रिया आणि विक्रीपर्यंत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन ही योजना लागू करण्यात येणार आहे. ही योजना पुढील पाच वर्षांसाठी राबविण्यात येईल आणि त्यासाठी १ हजार ३२५ कोटी रुपये खर्च येईल.

# आंतरजातीय विवाह केलेल्यांचा घेणार शोध, वाद मिटविणार; समिती स्थापन

## 13 सदस्यांची समिती, महिला व बाल विकास मंत्री मंगल प्रभात लोढा समितीचे अध्यक्ष

। मुंबई । महाईन्यूज ।

**आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांची नोंद ठेवणारी समिती मंगळवारी राज्य सरकारने स्थापन केली. १३ सदस्यांची ही समिती असून महिला व बाल विकास मंत्री मंगल प्रभात लोढा या समितीचे अध्यक्ष आहेत. अ‍ॅड. प्रकाश साळशिंगीकर यांच्यासह नांदेड येथील वकील या समितीचे सदस्य आहेत.**



नोंदणीकृत व अनोंदणीकृत विवाह व धार्मिक स्थळी झालेले विवाह. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह. पळून केलेले विवाह यांची माहिती घेण्याचे काम ही समिती करणार आहे. तसेच ही जोडपी कुटुंबियांच्या संपर्कात आहेत का याची माहिती घेणे व हे जोडपे संपर्कात नसल्यास त्यांच्याकडून कुटुंबियांची माहिती घेणे. कुटुंबियांचा विवाहाला विरोध असल्यास त्यांचे समपूदेशन करणे. त्यांच्यातील वाद मिटवणे ईत्यादी कामे ही समिती करणार आहे.


गेल्या अनेक महिन्यांपासून लव्ह जिहादच्या मुद्द्यावर भाजपच्या अनेक आमदार आणि नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. तसेच राज्यात वारंवार लव्ह जिहादच्या घटना घडत असल्याचा दावा भाजपच्या आमदारांनी केला आहे. यात लिव्ह इनमध्ये राहत असलेल्या श्रद्धा वालकर या तरुणीची दिल्लीतील तिचा लिव्ह इन पार्टनर आफताबने हत्या केल्यानंतर या मुद्द्यावर खूप चर्चा झाली. श्रद्धा वालकरची हत्या हा लव्ह जिहादचाच प्रकार असल्याचा दावा केला जात आहे. तसेच अशा घटनांना आळा घालण्यासाठी लव्ह जिहादविरोधात कायदा आणण्याची मागणी जोर धरत होती.

बाल व महिला कल्याण मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आंतरजातीय विवाहांचा तपशील ठेवण्यासाठी समिती स्थापन करणार असल्याची घोषणा केली होती. त्यानुसार ही समिती मंगळवारी स्थापन करण्यात आली आहे. बाल व महिला कल्याण मंत्री मंगल प्रभात लोढा हे या समिती अध्यक्ष आहेत. बाल व महिला कल्याण सचिव तसेच आयुक्त, बाल व महिला कल्याण सह सचिव व उपायुक्ता हे या समितीचे सदस्य आहेत. अ‍ॅड. साळशिंगिकर यांच्यासह नांदेड येथील अ‍ॅड. योगेश देशपांडे हेदेखील या समितीचे सदस्य आहेत.

# राज्यात पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

## सदानंद दाते आता एटीएसचे प्रमुख, नांगरे पाटलांचाही खांदेपालट

। मुंबई । महाईन्यूज ।



राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) कलम २२ यामधील तरतुदींनुसार हे बदल करण्यात आले असून बदलीने, पदोन्नतीने आणि पद उन्नत करून हे खांदेपालट करण्यात आले आहेत.

मीरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्त सदानंद दाते यांना दहशतवाद विरोधी पथकाचा पदभार देण्यात आला आहे. तर, मुंबईचे सह पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांना लाचलुचपत प्रतिबंध विभागात बढती मिळाली आहे. मिलिंद भारांबे यांना नवी मुंबईचे पोलीस आयुक्तपद देण्यात आले आहे. तर, मुंबई वाहतूक विभागाचे सह पोलीस आयुक्त राज वर्धन यांना महाराष्ट्र राज्य सुरक्षा मंडळात अपर पोलीस महासंचालक पद देण्यात आले आहे. विनय कुमार चौबे यांना पद उन्नत करून पिंपरी चिंचवड येथील पोलीस आयुक्तपद देण्यात आले आहे. पुणे शहराचे पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता यांना कायदा आणि सुव्यवस्था विभागात अपर पोलीस महासंचालक पद देण्यात आले असून निकेत कौशिक यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागात अपर पोलीस महासंचालकपदी नियुक्त करण्यात आले आहे. शिरीष जैन राज्य गुप्तवार्ता विभागाचे सहआयुक्त असतील तर, संजय मोहिते कायदा आणि सुव्यवस्था विभागात विशेष पोलीस महानिरिक्षकपदी नियुक्त करण्यात आले आहेत. नवीनचंद्र रेड्डी अमरावती शहर पोलीस आयुक्त, आरती सिंह मुंबईतील सशस्त्र अपर पोलीस आयुक्त, नामदेव चव्हाण गुन्हे अन्वेषण विभागात पोलीस उपमहानिरिक्षक, निसार तांबोळी मुंबई वाहतूक अपर पोलीस आयुक्त नियुक्त करण्यात आले आहेत.

# सैन्यसंघर्षावरून वादंग!

## भारताच्या तत्परतेमुळे चीनचा घुसखोरीचा प्रयत्न फसला; राजनाथ सिंह

। नवी दिल्ली ।

**"अरुणाचल प्रदेशमधील तवांग सेक्टरच्या यांग्त्से परिसरात प्रत्यक्ष ताबारेषेचे उल्लंघन करून घुसखोरीचा चिनी सैनिकांचा प्रयत्न भारताच्या शूर जवानांनी फोल ठरवला. या चकमकीमध्ये दोन्हीकडील सैनिक किरकोळ जखमी झाले. प्राणहानी झालेली नसून, एकही जवान गंभीर जखमी झालेला नाही," असे स्पष्टीकरण संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी मंगळवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये दिले. मात्र, चिनी घुसखोरीच्या मुद्द्यावर सभागृहात चर्चेची मागणी विरोधकांनी लावून धरली. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभेचे उपसभापती हरिवंश यांनी चर्चेला अनुमती न दिल्यामुळे दोन्ही सभागृहांतील विरोधकांनी सभात्याग केला.**



दोन वर्षांपूर्वी लडाखमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न हाणून पाडल्यानंतरही, ९ डिसेंबर रोजी अरुणाचल प्रदेशमधील तवांग परिसरात चिनी सैनिकांनी पुन्हा भारताची कुरापत काढली. प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडून आलेल्या चिनी सैनिकांना भारतीय जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले.

ईशान्येकडील भागांमध्ये, प्रामुख्याने लडाख आणि अरुणाचल प्रदेशमध्ये चीनच्या आक्रमक भूमिकेवरून विरोधकांनी मंगळवारी केंद्र सरकारला जाब विचारला. चीनबाबत केंद्र सरकार मवाळ भूमिका घेतल्याचा आरोप विरोधकांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांत येऊन निवेदन देण्याची मागणी काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी केली. मंगळवारी राजनाथ सिंह यांनी संरक्षण दलाच्या तीनही प्रमुखांच्या बैठकीनंतर लोकसभेत दुपारी बारा वाजता व राज्यसभेत साडेबारा वाजता एक पानी लिखित निवेदन वाचून दाखवले. 'घटनेनंतर ११ डिसेंबर रोजी तिथे तैनात असलेल्या भारत व चीनच्या लष्करी अधिकाऱ्यांनी ध्वजबैठक घेऊन चर्चा केली. घुसखोरी न करण्याचा तसेच, तवांगच्या प्रत्यक्ष ताबारेषेवर शांतता राखण्याचा इशारा चीनला देण्यात आला आहे. तसेच, या घटनेची गंभीर दखल घेत भारताने राजनैतिक स्तरावरही नाराजी व्यक्त केली आहे,' असे राजनाथ सिंह यांनी सांगितले.

> अरुणाचल प्रदेशमधील तवांग सेक्टरमध्ये ९ डिसेंबरला चिनी सैनिकांनी प्रत्यक्ष ताबारेषा ओलांडून 'जैसे थे' परिस्थितीचा भंग केला. घुसखोरी करणाऱ्या चिनी सैनिकांना भारतीय जवानांनी तात्काळ रोखून त्यांना चिनी हद्दीत जाण्यास भाग पाडले. – राजनाथ सिंह, संरक्षणमंत्री
>
> - जे. पी. नड्डा, भाजपचे अध्यक्ष

### शहांचा काँग्रेसवर हल्लाबोल

केंद्रात मोदींचे सरकार असेपर्यंत भारताची एक इंचही जमीन चीन बळकावू शकणार नाही, अशी ग्वाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली. माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या चीनवरील प्रेमामुळे भारताला संयुक्त राष्ट्रांतील कायम सदस्यत्व गमवावे लागले, असे शहा म्हणाले. तसेच राजीव गांधी फाउंडेशनबाबत (आरजीएफ) लोकसभेत लेखी प्रश्न विचारला होता. विदेशी देणगी नियंत्रण कायद्याचे उल्लंघन केल्यामुळे 'आरजीएफ'ची नोंदणी केंद्र सरकारने रद्द केली आहे. या संस्थेने चिनी दूतावासाकडून १.३५ कोटींची देणगी घेतली होती. यासंदर्भात केंद्र सरकार लोकसभेत सविस्तर उत्तर देणार होते. त्यामुळे काँग्रेसचे पितळ उघडे पडले असते. ही नामुष्की टाळण्यासाठी संसदेमध्ये गोंधळ घातल्याची टीका शहा यांनी केली.

### विरोधकांचे समाधान नाही

राजनाथ सिंह यांचे निवेदन अत्यंत त्रोटक असल्याने ते पाच मिनिटांमध्ये वाचून संपले. त्यामुळे राज्यसभेत काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, शिवसेना, द्रमुक, राष्ट्रीय जनता दल, माकप-भाकपसह अन्य विरोधी पक्षांचे सदस्य आक्रमक झाले. चिनी घुसखोरीचा मुद्दा अत्यंत गंभीर असल्याने या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. त्यावर हरिवंश यांनी, नक्षलवादी व दहशतवादी हल्ल्यांच्या घटनांनंतरही सभागृहांमध्ये चर्चा केली गेली नसल्याचे सांगत ही मागणी फेटाळली. काँग्रेस, शिवसेना, तृणमूल काँग्रेससह विरोधी पक्षांनी दोन्ही सभागृहांमध्ये स्थगन प्रस्तावाच्या नोटिसा दिल्या होत्या. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास व राज्यसभेत शून्य प्रहरात विरोधी पक्षांनी तवांगमधील चिनी घुसखोरीचा मुद्दा उपस्थित केला. दोन्ही सभागृहांमध्ये काँग्रेसचे सदस्य अध्यक्षांसमोरील हौदात येऊन घोषणाबाजी करत होते.

त्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज तहकूब करण्यात आले. राज्यसभेत विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनीही उपसभापतींकडे मुद्दा मांडण्याची अनुमती मागितली होती. राजनाथ सिंह यांच्या निवेदनानंतरही खरगे यांनी, या घटनेसंदर्भात चार प्रश्न केंद्र सरकारला विचारायचे आहेत, असे सांगितले.

विरोधकांना बोलू न देण्याची 'प्रथा' योग्य नसल्याचे राष्ट्रीय जनता दलाचे मनोज झा आक्रमकपणे मांडत होते. पण उपसभापतींनी बोलू न दिल्याने काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभात्याग केला.

---

## अफगाणिस्तान त्वरित सोडण्याची चीनची नागरिकांना सूचना

। इस्लामाबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील चीनच्या मालकीच्या एका हॉटेलवर 'इस्लामिक स्टेट' या दहशतवादी संघटनेने सोमवारी केलेल्या हल्ल्यानंतर चीनने या देशातील आपल्या नागरिकांना अफगाणिस्तान लवकरात लवकर सोडण्याची सूचना केली आहे.



अफगाणिस्तानची राजधानी काबूलमधील चीनच्या मालकीच्या एका हॉटेलवर 'इस्लामिक स्टेट' या दहशतवादी संघटनेने सोमवारी केलेल्या हल्ल्यानंतर चीनने या देशातील आपल्या नागरिकांना अफगाणिस्तान लवकरात लवकर सोडण्याची सूचना केली आहे. अफगाणिस्तानच्या तालिबान शासकांसाठी चीनची ही भूमिका धक्कादायक ठरणार आहे. अफगाणिस्तानाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होण्यापासून वाचवण्यासाठी तालिबान सरकारला विदेशी गुंतवणुकीची निकडीची गरज असताना चीनने हे पाऊल उचलले आहे. या हल्ल्यात तीन हल्लेखोरांसह पाच जण ठार झाल्याचे समजते. तालिबानचा प्रमुख प्रतिस्पर्धी 'इस्लामिक स्टेट' या संघटनेने सोमवारी काबूलच्या लाँगन हॉटेलवर झालेल्या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली. या हल्ल्यात तीन हल्लेखोर व इमारतीच्या खिडकीतून उडी मारून पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या किमान दोन विदेशी नागरिकांचा मृत्यू झाला. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन यांनी या हल्ल्याचे वर्णन 'भीषण' असे केले. या हल्ल्यामुळे चीनला मोठा धक्का बसला आहे. चीनने या घटनेची तपशीलवार चौकशी करण्याची मागणी करून चिनी नागरिक, संस्था, परियोजनांच्या सुरक्षेसाठी तालिबान सरकारला योग्य ती पावले उचलण्यास सांगितले आहे. काबूलमधील चिनी दूतावासाने या हल्ल्याची झळ पोहोचलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी एक पथक पाठवल्याचे सांगितले.

## "आता पप्पू कोण आहे?" तृणमूलच्या खासदार मोईत्रांचा सरकारवर हल्लाबोल!

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भाजपाच्या अनेक राष्ट्रीय स्तरावरील नेतेमंडळींनी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना लक्ष्य करण्यासाठी 'पप्पू' या शब्दाचा अनेकदा वापर केल्याचं दिसून आलं आहे. त्यामुळे या शब्दावरून काँग्रेसकडूनही वारंवार भाजपावर टीकास्र सोडलं जातं. आता हा शब्द थेट देशाच्या संसदेमध्ये ऐकायला येऊ लागला असून तृणमूलच्या खासदार महुआ मोईत्रा यांनी एका विषयावरील चर्चेदरम्यान लोकसभेमध्ये थेट मोदी सरकारलाच "आता पप्पू कोण आहे?" असा परखड सवाल केला आहे. देशाची आर्थिक स्थिती आणि नागरिकत्वाचा त्याग केलेल्या भारतीयांबाबत चर्चा सुरू असताना मोईत्रांनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला.



### "पुरवणी मागण्यांमुळे तिजोरीवर अतिरिक्त भार"

लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान, मोईत्रा यांनी मोदी सरकारवर टीका करताना अनेक मुद्द्यांवरून परखड सवाल केले. "लोकसभेत मंजूर करण्यात आलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये केंद्र सरकारच्या तिजोरीवर अतिरिक्त ४.३६ लाख कोटींचा भार पडणार आहे. यामुळे देशाच्या अर्थसंकल्पातील तरतुदी आणि तुटीच्या रकमेपेक्षाही जास्त ही रक्कम होईल", असं महुआ मोईत्रा लोकसभेत बोलताना म्हणाल्या. "एनएसओच्या आकडेवारीनुसार, औद्योगिक क्षेत्राचं उत्पादन ऑक्टोबर महिन्यात तब्बल ४ टक्क्यांनी घटलं आहे. गेल्या २६ महिन्यांतला हा नीचांकी आकडा आहे. इंडस्ट्रियल प्रोडक्शनच्या निर्देशांकात नोंद होणाऱ्या उत्पादन क्षेत्रासह इतर औद्योगिक क्षेत्रामध्येही नकारात्मक विकासदर नोंद झाला आहे.

# अश्लील चित्रपटप्रकरणी शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्राला मिळाला दिलासा



बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीचा पती राज कुंद्राला अश्लील चित्रपट बनवून ती ओटीटी प्लॅटफॉर्मवर दाखवल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा देण्यात आला आहे. सुप्रीम कोर्टाने राज कुंद्रा, अभिनेत्री शर्लिन चोप्रा, पुनम पांडे आणि उमेश कवत यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

### राज कुंद्रा विरुद्धा 1 हजार पानांचे आरोपत्र दाखल

मागील महिन्यात मुंबई सायबर क्राईमने राज कुंद्रासह सर्व आरोपींविरुद्ध 1 हजार पानांचे आरोपत्र दाखल केले होते. पोलिसांचा दावा आहे की, राज कुंद्राने अश्लील चित्रपट शूट केले आणि ते ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रसारित केले. दुसरीकडे, कुंद्राचे वकील प्रशांत पाटील यांनी दावा केला आहे की कोणत्याही प्रकारचे साहित्य किंवा बेकायदेशीर व्हिडिओ प्रसारित करण्यात त्यांचा सहभाग नव्हता.

2019 मध्ये झाला होता गुन्हा दाखल

सायबर पोलिसांनी राज कुंद्रा विरोधात 2019 मध्ये तक्रार दाखल केली होती. ज्यामध्ये असा दावा करण्यात आला होता की, दिग्दर्शक राज कुंद्रा काही वेबसाइट्ससाठी अश्लील चित्रपट तयार करुन त्याचे वितरण करण्यात गुंतला होता.

### सप्टेंबर 2021 मध्ये मिळाला जामीन

मुंबई सायबर क्राईमद्वारे हाय-प्रोफाईल प्रकरण उघडकीस आल्यानंतर सप्टेंबर 2021 मध्ये जामीन मिळण्यापूर्वी राज कुंद्राला 2 महिन्यांच्या कोठडीत पाठवले होते.

# “ ...तेव्हा मला आईने झाडूने मारलं होतं” -प्राजक्ता माळी



**मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री प्राजक्ता माळी कायमच चर्चेत असते. प्राजक्ताचा चाहता वर्ग मोठा असून ती सोशल मीडियावरुन चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करते. प्राजक्ताने एका कार्यक्रमादरम्यान तिच्या कॉलेज जीवनातील एक प्रसंग सांगितला होता.**

प्राजक्ता अभिनेत्रीबरोबरच एक उत्तम नृत्यांगणा व लेखिकाही आहे. प्राजक्ताचं ‘प्राजक्तप्रभा’ हे पुस्तकही प्रकाशित झालं आहे. सुरुवातीला तिला डायरी लिहायचीही आवड होती. त्यामुळे दिवसभरात घडलेल्या सगळ्या गोष्टींची नोंद प्राजक्ता डायरीमध्ये करायची.

प्राजक्ता कॉलेजमध्ये शिकत असताना डायरी तिच्या आईला सापडली. याचाच किस्सा प्राजक्ताने सांगितला होता.

“एखाद्या प्रसंगाबद्दल मला जे वाटतं ते मी माझ्या डायरीत लिहायचे. त्यावेळी एखाद्या प्रसंगाबाबत काय वाटत होतं, हे आज वाचताना मला फार गंमत वाटते. आज माझ्याकडे ७-८ वर्षांपूर्वीच्याही डायरी आहेत. असंच एके दिवशी माझ्या आईला माझी डायरी सापडली. तेव्हा मी अकरावीत शिकत होते”, असं प्राजक्ता म्हणाली.

# ‘पठाण’चं नवं गाणं नेटकऱ्यांचा निशाण्यावर

बॉलिवूड अभिनेता शाहरुख खानचा बहुचर्चित ‘पठाण’ चित्रपट २०२३ मध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटातून जवळपास ४ वर्षांनंतर शाहरुख खान पुन्हा मोठ्या पडद्यावर कमबॅक करत आहे. अशात आता या चित्रपटातील पहिलं गाणं प्रदर्शित झालं असून या गाण्याने सोशल मीडियावर अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शाहरुख खान आणि दीपिकाची मुख्य भूमिका असलेल्या ‘पठाण’ चित्रपटाचं पहिलं गाणं ‘बेशरम रंग’ प्रदर्शित झालं आहे. या गाण्यात एकीकडे शाहरुख खानचा डॅशिंग लूक पाहायला मिळत आहे. तर दुसरीकडे दीपिका पदुकोण पहिल्यांदाच एवढ्या बोल्ड अवतारात दिसत असून या गाण्याची सोशल मीडियावर जोरदार चर्चा होताना दिसत आहे. त्याआधी दीपिकाचा या गाण्यातील बिकिनी लूकही चर्चेत आला होता. आता हे गाणं प्रदर्शित झाल्यावर प्रेक्षकांना ते पसंतीस पडलं आहे, पण याबरोबरच आता नेटकरी या गाण्याला ट्रोलही करू लागले, रेड्डीट वेबसाइटवर कित्येक लोकांनी या गाण्याच्या चित्रीकरणाची खिल्ली उडवत याची तुलना याच चित्रपटाचे दिग्दर्शक सिद्धार्थ आनंद यांच्या ‘वॉर’ चित्रपटातील ‘घुंगरू’ या गाण्याशी केली आहे.हृतिक रोशन, टायगर श्रॉफ यांचा ‘वॉर’ हा चित्रपट चांगलाच गाजला होता. त्यातही हृतिक आणि अभिनेत्री वाणी कपूर यांच्यावर अशाच प्रकारचं गाणं चित्रित करण्यात आलं होतं. त्याचा संदर्भ देत लोकांनी शाहरुखच्या पठाणच्या या गाण्याला ट्रोल करायला सुरुवात केली आहे. दोन्ही गाण्यांमध्ये मुख्य अभिनेत्री या हॉट स्विमसूटमध्ये नाचताना दिसत आहेत, शिवाय दोन्ही गाणी ही बीचवर शूट करण्यात आल्याचंही नेटकऱ्यांनी ध्यानात आणून दिलं आहे.



# उर्फी जावेदच्या फॅशनला कंटाळून वकिलानेच! केली तक्रार



सोशल मीडियावर आपल्या अतरंगी कपड्यांमुळे प्रसिद्ध असलेली अभिनेत्री आणि मॉडेल उर्फी जावेदच्या अडचणीत वाढ झालेली आहे. उर्फीच्या रोजच्या चित्र-विचित्र फॅशनला कंटाळून मुंबईतील एका वकीलाने स्वतः अंधेरी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे. 11 डिसेंबर रोजी वकील अली काशिफ खान देशमुख यांनी तिच्याविरोधात तक्रार दाखल केली आहे.

### उर्फी जावेद समाजात अश्लीलता पसरवते

उर्फी जावेद अश्लील पोशाख परिधान करुन समाजात आणि सोशल मीडियावर अश्लीलता पसरवते असा आरोप तिच्यावर करण्यात आला आहे. वकील अली काशिफ खान देशमुख यांनी लिखित स्वरुपात अर्ज देत अशी तक्रार दाखल केली आहे. शिवाय उर्फीच्या फॅशनला सोशल मीडियावर वाईट पद्धतीने अनेकजण ट्रोल देखील करतात मात्र तरीही तिच्यावर कोणताच परिणाम होत नाही. ती प्रत्येकवेळी ट्रोलर्सला सडेतोड उत्तर देते.

### दिल्लीमध्ये देखील झाली होती तक्रार

याआधी देखील उर्फी विरोधात दिल्लीच्या पोलीस ठाण्यात एका व्यक्तीने तक्रार दाखल केली होती. यावेळी देखील उर्फीवर समाजात अश्लीलता पसरवत असल्याचा आरोप उर्फीवर करण्यात आला होता. शिवाय मागील काही दिवसांपूर्वी ती ‘हाय हाय ये मजबूरी’ या म्युझिक व्हिडीओमुळेही देखील अडचणीत सापडली होती.मागील काही दिवसांपूर्वी लेखक चेतन भगतने तिच्या कपड्यांवरुन खिल्ली उडवली होती. तर हिंदुस्तानी भाऊने देखील उर्फीला धमकी दिली होती. तेव्हाही उर्फीने त्यांना सडतोड उत्तर दिलं. सध्या उर्फी स्प्लिट्सविला शोमध्ये व्यस्त आहे.

# फुटबॉल विश्वातील नवतारे!

## खुमाखदार कामगिरी करून स्वतःचा दर्जा सिद्ध करण्याची युवा खेळाडूंना संधी

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




फुटबॉल विश्वचषक ही खेळांतील सर्वांत मोठी आणि लोकप्रिय स्पर्धा मानली जाते. विश्वचषकावर नाव कोरणे हे प्रत्येकच सहभागी संघाचे स्वप्न असते. मात्र खेळाडूंसाठी वैयक्तिक दृष्ट्याही विश्वचषक स्पर्धा महत्त्वाची असते. या स्पर्धेत दिमाखदार कामगिरी करून स्वतःचा दर्जा सिद्ध करण्याची, नावलौकिक मिळवण्याची विशेषतः युवा खेळाडूंना संधी असते. यंदा कतार येथे सुरू असलेल्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतही काही युवा खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधले आहे. याच खेळाडूंवर एक नजर.

ब्राझीलच्या संघाचे दोन दशकांपासूनचा विश्वचषक विजयाचा दुष्काळ संपवण्याचे स्वप्न अधुरे राहिले. मात्र, ब्राझीलच्या काही युवा खेळाडूंनी यंदाच्या स्पर्धेत चमकदार कामगिरी केली आणि यात २५ वर्षीय रिचार्लिसनचे नाव आघाडीवर होते. रिचार्लिसनने ब्राझील फुटबॉलमध्ये प्रतिष्ठेची मानली जाणारी ९ क्रमांकाची जर्सी परिधान करताना आघाडीपटूची भूमिका चोख बजावली. क्लब फुटबॉलमध्ये टॉटनहॅमचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रिचार्लिसनने विश्वचषकाच्या पाच सामन्यांत तीन गोल केले. त्याने सर्बियाविरुद्ध सलामीच्या लढतीत दोन गोल नोंदवले होते आणि यापैकी दुसरा गोल आतापर्यंतच्या स्पर्धेतील सर्वोत्तम गोल होता. त्याने 'ओव्हरहेड किक' मारून गोल करत चाहत्यांना थक्क करून सोडले.

### रिचार्लिसनने 'ओव्हरहेड किक'

मारून केलेल्या गोलसाठी आक्रमक व्हिनिशियस ज्युनियरने साहाय्य केले होते. रिचार्लिसन आणि नेयमार यांच्यासह व्हिनिशियसने ब्राझीलच्या आक्रमणाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. आक्रमणात डाव्या बाजूने खेळणारा व्हिनिशियस चेंडूवर ताबा मिळवून थेट प्रतिस्पर्ध्याच्या गोलकक्षाकडे धावतो. तसेच वेगवान खेळ करणाऱ्या व्हिनिशियसला रोखणे प्रतिस्पर्धी बचावपटूंना अवघड जाते. क्लब फुटबॉलमध्ये रेयाल माद्रिदकडून खेळणाऱ्या २२ वर्षीय व्हिनिशियसने गेल्या काही हंगामांत सातत्यपूर्ण कामगिरी करताना आपला ठसा उमटवला आहे. त्याने गेल्या हंगामातील ५२ सामन्यांत २२ गोल, तर सध्याच्या हंगामात २१ सामन्यांत १० गोल केले आहेत.

### ज्युड बेलिंगहॅम (मध्यरक्षक, इंग्लंड)

इंग्लंडचा १९ वर्षीय मध्यरक्षक ज्युड बेलिंगहॅम सध्याच्या घडीला विश्वातील सर्वांत प्रतिभावान युवा खेळाडूंपैकी एक मानला जातो. चेंडू मिळताच संयम राखून योग्य पास देणे, प्रतिस्पर्ध्याच्या खेळाडूकडून चेंडू काढून घेणे आणि चेंडूवर ताबा मिळवताना प्रतिस्पर्धी संघाच्या बचावावर हल्ला करणे, ही बेलिंगहॅमच्या खेळाची वैशिष्ट्ये आहेत. त्याने यंदाच्या विश्वचषकात अप्रतिम कामगिरी केली. इंग्लंडच्या उपांत्यपूर्व फेरीपर्यंतच्या प्रवासात बेलिंगहॅमची भूमिका महत्त्वाची होती. त्याने सलामीच्या लढतीत इराणविरुद्ध गोलही नोंदवला. बेलिंगहॅम सध्या जर्मनीतील क्लब बोरुशिया डॉर्टमंडचे प्रतिनिधित्व करतो. मात्र, लिव्हरपूल, चेल्सी आणि रेयाल माद्रिद यांसारखे युरोपातील आघाडीचे क्लब त्याला आपल्या संघात दाखल करून घेण्यासाठी उत्सुक आहेत.

### जोस्को ग्वार्डियोल (बचावपटू, क्रोएशिया)

लुका मॉड्रिच आणि माटेओ कोव्हाचिच या क्रोएशियाच्या तारांकित मध्यरक्षकांप्रमाणे बचावपटू जास्को ग्वार्डियोलचा प्रवास डिनामो झाग्रेब क्लबपासून सुरू झाला. त्याने २०१९-२०च्या हंगामात झाग्रेबकडून व्यावसायिक फुटबॉलमध्ये पदार्पण केले. त्यानंतर जर्मन क्लब आर लिपझिगने त्याला संघात समाविष्ट करून घेतले. गेल्या काही काळापासून त्याचे चेल्सीसोबत नाव जोडले जात आहे. मात्र, विश्वचषकातील त्याच्या दर्जेदार कामगिरीनंतर चेल्सीसह युरोपातील अन्य आघाडीचे संघही त्याला खरेदी करण्यासाठी उत्सुक असतील. डाव्या पायाने खेळणारे बचावपटू क्वचितच आढळतात आणि ग्वार्डियोलची हीच बाब खास ठरते. उंचपुरा, दणकट शरीरयष्टीचा २० वर्षीय ग्वार्डियोल भक्कम बचावासाठी ओळखला जातो. त्याने विश्वचषकाच्या उपांत्यपूर्व फेरीत ब्राझीलच्या नेयमारला अनेकदा रोखले. तसेच तो आक्रमणातही योगदान देऊ शकतो.

---

# रहाणे, इशांतला वार्षिक करारातून डच्चू?

## हार्दिक, सूर्यकुमार, गिलला बढती मिळण्याची शक्यता

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




भारतीय संघातील स्थान गमावून बसलेले अनुभवी खेळाडू फलंदाज अजिंक्य रहाणे आणि वेगवान गोलंदाज इशांत शर्मा यांना भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) नव्या वर्षिक कराराच्या यादीतून वगळले जाण्याची शक्यता वर्तवण्यात आहे. त्याच वेळी सूर्यकुमार यादव आणि शुभमन गिल यांना वरील श्रेणीत बढती मिळणे अपेक्षित आहे.

'बीसीसीआय'च्या नव्या कार्यकारी परिषदेची २१ डिसेंबरला बैठक होणार असून, या बैठकीत वार्षिक करारांबाबतचे निर्णय घेतले जातील. नव्या यादीत सूर्यकुमार आणि गिल यांची वेतनश्रेणी वाढू शकते, तर रहाणे, इशांत यांना वगळले जाऊ शकते. ट्वेन्टी-२० संघाचा भावी कर्णधार म्हणून हार्दिक पंड्याकडे बघितले जात आहे. त्यामुळे सध्या 'क' श्रेणीत असलेल्या हार्दिकला 'ब' श्रेणीत बढती मिळू शकते. करारात 'अ+'श्रेणीतील खेळाडूंना ७ कोटी, 'अ' श्रेणीतील खेळाडूंना ५ कोटी, 'ब' श्रेणीतील खेळाडूंना ३ कोटी आणि 'क' श्रेणीतील खेळाडूंना १ कोटी रुपयांचे वार्षिक मानधन मिळते.

### विषय पत्रिकेवरील प्रमुख मुद्दे

- खेळाडूंची वेतनश्रेणी निश्चित करणे
- 'बायजू' आणि 'एमपीएल' या पोशाख पुरस्कृत करणाऱ्या कंपन्यांविषयी निर्णय घेणे
- सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे
- भारतातील आगामी आंतरराष्ट्रीय हंगामातील सामन्यांच्या ठिकाणांना मान्यता देणे

अरुणाचलमध्ये भारत-चीन लष्करी संघर्ष: "मोदींनी स्वत:ची प्रतिमा वाचवण्यासाठी देशाला धोक्यात टाकलं, LAC पासून १५ ते १८ किमी आतपर्यंत... "आज पुणे बंदची हाक,शहरात शुकशुकाट; पोलिसांचा कडक बंदोबस्त

नव्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीत एकूण १२ विषय चर्चेत येतील. ही बैठक आभासी पद्धतीने होणार आहे. ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेतील कामगिरी आणि बांगलादेशविरुद्ध एकदिवसीय मालिकेतील अपयश हे मुद्दे विषयपत्रिकेवर नसले तरी, अध्यक्षांना आवश्यक वाटल्यास या विषयांवर चर्चा होऊ शकते. त्याचबरोबर देशांतर्गत स्पर्धेत वापरण्यात येणाऱ्या व्हीजेडी पद्धतीचे जनक व्ही. जयदेवन यांना एकरकमी मानधन देण्याबाबतचा मुद्दाही पुढे येऊ शकतो.

---

# वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतून पाकिस्तान बाहेर

## इंग्लंड संघ पाचव्या क्रमांकावर टीम इंडियाचे गणित काय?

भुकूम ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतून पाकिस्तान बाहेर गेल्यामुळे पाकिस्तानचे स्वप्न भंगले आहे. घरच्या मैदानावर इंग्लंडविरुद्ध २-० असा पराभव केला. मुलतान कसोटी सामन्यात पाकिस्तानचा इंग्लंडने २६ धावांनी पराभव केला. तसेच पाकिस्तानचा संघ ४२.४२ टक्के विजयासह गुणतालिकेत सहाव्या क्रमांकावर आहे. त्याचबरोबर पाकिस्तानशिवाय इंग्लंडचा संघही वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतून बाहेर पडला आहे. त्यामुळे इंग्लंड संघ पाचव्या क्रमांकावर आहे. परंतु टीम इंडियाचे गणित नेमके काय आहे, हे पाहणं महत्त्वाचं आहे.

टीम इंडियाला बांगलादेशविरुद्ध २ कसोटी आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशात ४ कसोटी मालिका खेळायच्या आहेत. यामध्ये ६ कसोटी सामन्यांमध्ये जर टीम इंडियाने २ कसोटी सामने गमावले तर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतून टीम इंडियाचाही पत्ता कट होऊ शकतो.

त्यामुळे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचण्यासाठी टीम इंडियाला बांगलादेशचा २-० असा पराभव करावा लागणार आहे. तसेच ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३-१ किंवा ३-० अशी मालिका जिंकावी लागणार आहे. टीम इंडिया वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत पोहोचू शकेल का, असा प्रश्न चाहत्यांच्या मनात आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपबद्दल बोलायचे झाले, तर ऑस्ट्रेलिया पहिल्या क्रमांकावर आहे. वेस्ट इंडिजविरुद्ध २-० ने मालिका जिंकल्यानंतर त्यांच्या विजयाची टक्केवारी ७५ टक्क्यांवर गेली आहे.